निवडसुची वर्ष २०२५-२०२६ मध्ये तहसिलदार संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना उप जिल्हाधिकारी संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्र.पदोन्नती-१०२५/प्र.क्र. २४६ /आस्था-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - २० ऑगस्ट, २०२६.

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. सेवाज्ये-२०२३/प्र.क्र.२१४/आस्था-०३, दि.१३.१०.२०२५.

शासन आदेश :-

सन २०२५-२६ या वर्षाच्या निवडसूचीकरीता तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने खालील नमुद तहसिलदार संवर्गातील अधिका-यांना वेतनश्रेणी एस-१९- (रू. ५५१००-१७५१००) मधून उप जिल्हाधिकारी संवर्गात वेतनश्रेणी एस-२०- (रू. ५६१००-१७७५००) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | जेष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | २१२६ | श्री.संदिपकुमार पुंडलिकराव भोसले | खुला |
| २. | २१८८ | श्री.महेश नारायणराव सावंत | खुला |
| ३. | २२५९ | श्री. मनिषा सुधाकर मेने | इ.मा.व |
| ४. | २३८७ | श्री.अमोल रमेश कदम | खुला |
| ५. | २३९२ | श्री. पुरुषोत्तम भुसारी | इ.मा.व |

| अ. क्र. | जेष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ६. | २३९३ | श्री. सुरेश काशीद | खुला |
| ७. | २३९५ | श्री. जयराज सुर्यवंशी | खुला |
| ८. | २३९६ | श्री. अमोल कदम | खुला |
| ९. | २३९७ | श्री. विपिन पाटील | खुला |
| १०. | २३९८ | श्री. सुशील बेल्हेकर | भ.ज.(क) |
| ११. | २३९९ | श्री.सुरेंद्र देशमुख | इ.मा.व |
| १२. | २४०० | श्री.संतोष बनकर | इ.मा.व |
| १३. | २४०२ | श्री.जीवक्कुमार कांबळे | अ.जा. |
| १४. | २४०३ | श्री. अनिलकुमार हेळकर | अ.जा. |
| १५. | २४०६ | श्री.संतोष डोईफोडे | अ.ज. |
| १६. | २४०७ | श्री. रविंद्र होळी | अ.ज. |
| १७. | २४०८ | श्रीम.सुरेखा स्वामी | इ.मा.व |
| १८. | २४१० | श्री.हरिश्चंद्र गाडे | अ.ज. |
| १९. | २४११ | श्री.प्रशांत सांगडे | अ.ज. |
| २०. | २४१२ | श्रीम. सीमा गजभिये | अ.जा. |
| २१. | २४१४ | श्रीम.तेजस्विनी जाधव | अ.जा. |
| २२. | २४१५ | कु.शिल्पा बोबडे | इ.मा.व |
| २३. | २४३७ | श्री.अमोल मोरे | खुला |
| २४. | २४३९ | श्री.पंकज लोखंडे | खुला |
| २५. | २४४६ | श्री.विशाल दौंडकर | खुला |

| अ. क्र. | जेष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६. | २४४७ | श्री.साहेबराव सोनवणे | इ.मा.व |
| २७. | २४४९ | श्री.सचिन भालेराव | खुला |
| २८. | २४५१ | श्री. कैलास अंडिल | खुला |
| २९. | २४५२ | श्री. आनंद देऊळगावकर | खुला |
| ३०. | २४५३ | श्री. सुरेश शेजूळ | खुला |
| ३१. | २४५५ | श्री. सतिश थेटे | इ.मा.व |
| ३२. | २४५६ | श्री. शिवाजी मगर | खुला |
| ३३. | २४५७ | श्री. संदिप राजपूरे | इ.मा.व |
| ३४. | २४५८ | श्री. योगेश चंद्रे | इ.मा.व |
| ३५. | २४६० | श्री.अरुण शेलार | इ.मा.व |
| ३६. | २४६२ | श्री.जितेंद्र इंगळे | इ.मा.व |
| ३७. | २४६३ | श्रीम.तेजस्विनी पाटील | खुला |
| ३८. | २४६४ | श्री.औदुंबर पाटील | भज (ड) |
| ३९. | २४६५ | श्री.नरेंद्र देशमुख | अ.जा. |
| ४०. | २४६६ | मो फसीयोद्दीन मो.रफियोद शेख | वि.जा.अ. |
| ४१. | २४६७ | श्री. अनिरुध्द कांबळे | अ.जा. |
| ४२. | २४६८ | डॉ. सुनिल चव्हाण | वि.जा.अ. |
| ४३. | २४६९ | श्री.सचिन लुंगटे | भ.ज.(क) |
| ४४. | २४७० | श्रीम.अश्विनी डमरे | खुला |
| ४५. | २४७१ | श्रीम.रचना पवार | इ.मा.व |

| अ. क्र. | जेष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ४६. | २४७२ | श्रीम.पल्लवी टेमकर | खुला |
| ४७. | २४७६ | श्रीम. रोशन मकवाने | इ.मा.व |
| ४८. | २४७७ | श्री.अमोल पोवार | भ.ज.(ब) |
| ४९. | २४८१ | श्रीम.शितल सोलाट | खुला |
| ५०. | २४८७ | श्री. राजेश चव्हाण | खुला |
| ५१. | २४८९ | श्री.अधिक पाटील | खुला |
| ५२. | २४९२ | श्री.अजय घोळवे | भज (ड) |
| ५३. | २४९३ | श्री.सचिन चौधर | भज (ड) |
| ५४. | २४९४ | श्री.कैलास हनुमंता चावडे | इ. मा. व. |
| ५५. | २४९६ | श्रीम.स्मिता मोहिते | खुला |
| ५६. | २४९८ | श्री.उत्तम दिनकर कुंभार | इमाव |
| ५७. | २४९९ | श्री.उमेश भास्कर पाटील | इमाव |

सदरचे आदेश हे सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेस अनुसरून निर्गमीत करण्यात येत आहेत.

**२.** सध्या महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्याचा कार्यक्रम सुरू आहे. त्याकरीता तहसिलदार संवर्गातील काही अधिकारी हे अधिसूचीत पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम संपल्यानंतर या पदोन्नत अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदी विचारात घेऊन सदर अधिकाऱ्यांना महसूली विभाग वाटप करून सविस्तर पदस्थापनेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. उक्त नमूद तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून उप जिल्हाधिकारी संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-

१) सदर तदर्थ पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ व विशेष अनुमती याचिका क्र. २५१८१/२०१८ व त्यातील आय.ए.क्र.२५९०/२०१९ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

२) सदर तदर्थ पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१ व रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ यामधील आय.ए.(स्टॅम्प) क्र.१०९१०/२०२१ व १०९११/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३) सदर तदर्थ पदोन्नती ही दिव्यांग आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.स्टँप ६८१९/२०२१ व अन्य यांचिकांवर मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४) सदर तदर्थ पदोन्नती मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल असलेल्या मूळ अर्ज क्र.३३९/२०२० मधील अवमान याचिका क्र.६९/२०२२ (श्रीमती मनिषा मोहिते वि. महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये होणा-या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५) सदर तदर्थ पदोन्नती ही मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेले मूळ अर्ज क्र. २३६/२०२१ (श्री. सूर्यकृष्णमूर्ती कोतापल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) व क्र.२३७/२०२१ (श्री. अजिंक्य पडवळ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर), मुळ अर्ज क्र. १५२२/२०२४ (श्री. सूर्यकृष्णमूर्ती कोतापल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन) व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील रिट याचिका क्र. ५८२१/२०२३ या न्यायालयीन प्रकरणांमध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

६) सदर तात्पुरती पदोन्नती ही मा. महाराष्ट्र प्रशासकीयय न्यायाधिकरण, मुंबई मुळ अर्ज क्र.५३८/२०२६ श्री. बि.व्ही. सोमवंशी व इतर विरूद्ध महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणांमध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

७) सरळसेवा कोटयाच्या रिक्त पदांवर व प्रतिनियुक्तीने रिक्त झालेल्या पदांवर देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती ही ११ महिने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होतील किंवा प्रतिनियुक्तीवरील उमेदवार परत येतील यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील व आवश्यकता असल्यास दर ११ महिन्यानंतर तदर्थ पदोन्नती एक दिवसाकरिता खंडित करुन पुढे चालू ठेवली जाईल. यासाठी तदर्थ पदोन्नती एक दिवसाकरिता खंडित करुन पुढे चालू ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापि, असे आदेश

निर्गमित झाले नाही, तरीदेखील दर ११ महिन्यानंतर तदर्थ पदोन्नती एक दिवसाकरिता खंडित करुन पुढे चालू ठेवली गेल्याचे मानण्यात येईल.

८) दरम्यानच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध झाल्यास किंवा प्रतिनियुक्तीवरील उमेदवार परत आल्यास तदर्थ पदोन्नत झालेल्या अधिका-यांस पदावनत करण्यात येईल. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असून सदर पदावर संबंधित अधिकाऱ्यांचा कायमस्वरूपी धारणाधिकार राहणार नाही.

९) सरळसेवेच्या कोट्यातील व प्रतिनियुक्तीच्या रिक्त पदांवर दिलेल्या तदर्थ पदोन्नत्या भविष्यात नियमित पदोन्नती कोटयामध्ये पदांच्या उपलब्धतेनुसार समायोजित करून नियमित निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्याच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

१०) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग दि.१३.१०.२०२५ अन्वये तहसिलदार संवर्गाची दि.०१.०१.१९९७ ते दि.३१.१२.२०१५ या कालावधीची अंतिम ज्येष्ठतासूची विचारात घेण्यात आली आहे. निवडसूची तयार करताना कोणीही पात्र ज्येष्ठ अधिकारी वगळण्यात आले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत. त्यामुळे सदर तदर्थ पदोन्नती, तहसिलदार संवर्गातील होणाऱ्या नियमितीकरणामुळे, अंतिम ज्येष्ठतासूचीतील होणाऱ्या बदलाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

११) पदोन्नतीच्या अनुषंगाने काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास व उप जिल्हाधिकारी संवर्गातील पदोन्नती कोट्यात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिकाऱ्याला पदावनत करण्याच्या अटीच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

१२) महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील नियम क्र. ८ व १४ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार पदोन्नत अधिकाऱ्यांनी वाटप करण्यात आलेल्या महसूली विभागात त्यांच्या पुढील पदोन्नती पुर्वी किमान ३ वर्ष सेवा करणे बंधनकारक राहील.

१३) संबंधित अधिका-यांनी पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्या-१२, दि.१२.०९.२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

१४) सविस्तर पदस्थापनेनंतर संबंधित अधिकारी सविस्तर पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीबाबत स्वारस्य नसल्याचे समजून सामान्य प्रशासन विभागाच्या स्थायी आदेशानुसार निवडसूचीतून त्यांचे नाव वगळण्यात येईल. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांची विनंती मान्य करता येणार नाही.

१५) उप जिल्हाधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१६) सदर पदोन्नती निव्वळ तदर्थ व तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी पदोन्नती सूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा, सेवाज्येष्ठतेचा व वेतननिश्चिती इ. बाबत कोणताही हक्क राहणार नाही.

१७)सदर पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

१८) तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिकाऱ्यांनी सविस्तर पदस्थापनेच्या पदावर रुजू होऊन कार्यभार स्वीकारल्यानंतरच उप जिल्हाधिकारी एस-२०- (रू. ५६१००-१७७५००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

१९) उपरोक्त पदोन्नत अधिका-यांविरुध्द भविष्यात कोणत्याही प्रकारचा फौजदारी अथवा इतर गुन्हा दाखल झाल्यास त्याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत तात्काळ शासनास सादर करण्यात यावा. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द क्षेत्रिय स्तरावर कोणतीही विभागीय चौकशी सुरु असल्यास अथवा सुरु झाल्यास तात्काळ शासनास अवगत करण्यात यावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८२०१८४०३७३०४८ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH
ASHOKRAO
VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.08.20 18:54:17 +05'30'

(महेश वरुडकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
७. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
८. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ मुंबई /नागपूर
१२. अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. संबंधित अधिकारी (विभागीय आयुक्त, कार्यालयामार्फत)
१५. सह सचिव (कार्यासन-१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१६. कक्ष अधिकारी (आस्था-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (कार्यासन आस्था-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई